विटासाठी माती उत्खननाची परवानगी देताना पर्यावरण विभागाने विहित केलेल्या शर्ती.

1. विटासाठी माती काढताना कोणत्याही स्फोटकाचा वापर करण्यात येणार नाही.
2. जमिनीच्या पातळीपासून दोन मीटर पेक्षा जास्त खोल खोदण्यात येवू नये..तसेच भूजल पातळीपासून दोन मीटरच्यावर पर्यंतच माती उत्खनन करण्यात यावे.उदा. पाण्याची पातळी तीन मीटर वर असल्यास जमिनीच्या पातळी पासून एक मीटर पर्यंतच खोदकाम करता येयील.
3. मातीचे खोदकाम करताना नैसर्गिकरित्या वाहत जाणाऱ्या पाण्याच्या कोणत्याही प्रवाहाची दिशा बदलण्यात येणार नाही.
4. माती खोदकाम केल्यामुळे निर्माण झालेल्या खड्याचा पाण्याचे पुनर्भरण होयील या दृष्टीने उपयोग करावा. उदा. पाझर तलाव किंवा बोडी तयार करावी.
5. खोदकामाच्या ठिकाणी चारीबाजूनी कुंपण करण्यात यावे जेणेकरून खड्यामध्ये पडून अपघात होणार नाही.
6. खोद्कामापासून मातीची वाहतूक अन्य ठिकाणी करण्यात येत असल्यास अशा वाहवरील मालाला ताडपत्रीने झाकण्यात यावे जेणेकरून प्रदूषण होणार नाही.

7. खोदकामामुळे निर्माण झालेल्या खड्यामध्ये डास निर्माण होणार नाहीत या बाबत आवश्यक ती उपाय योजना करण्यात यावी.
8. खोदकाम करणाऱ्या मजुरांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची व शौचालयाची व्यवस्था करणे बंधनकारक असेल.
9. खोदकाम करताना किती खोल खोदकाम केलेले आहे याची माहिती होण्यासाठी मुळ मातीचा एक मीटर रुंदीचा एक स्तंभ जशाच्या तसा ठेवण्यात यावा. असा स्तंभ शेजारच्या सर्वे नंबरच्या सीमारेषेला लगतचा असावा.